CMYK

बीड । मंगळवार
१८.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३१२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 

# सरपंच अण्णासाठी मस्साजोगकर मैदानात
## ७० दिवसाचा संयम सुटला, २५ फेब्रुवारी दिवस ठरला



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्येला जवळपास ७० दिवस झाले आहे. न्याय नाही मिळाला तर आर पारची लढाई लढू, अशी टोकाची भूमिका मस्साजोगच्या गावकऱ्यांनी घेतली आहे. आरोपी कृष्णा आंधळे याला अटक करण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. जर मागण्या पूर्ण झाल्या नाही तर मस्साजोगकर थेट मंत्रालयावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला जवळपास ७० दिवस होत आले आहे. अद्याप सरकारने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली ▶▶पान २ वर

### प्रमुख मागण्या काय?

✻ पीआय महाजन पीएसआय राजेश पाटीलला सह आरोपी करा ✻ कृष्णा आंधळेला अटक करा ✻ उज्वल निकमांची तात्काळ नियुक्ती करा ✻ प्रकरण फास्ट कोर्टात चालवा ✻ आरोपींना पळून नेल्याची मदत करणाऱ्यांना सीडीआर करून त्यांना आरोपी करा ✻ घटना झाल्यावर कळमच्या दिशेला गाडी का गेली याची चौकशी करा ✻ आवादा कंपनीची भूमिका स्पष्ट करा ✻ वाशी पोलीस ठाण्याचे पीआय रमेश घुले यांना बडतर्फ करून सहआरोपी करा ✻ धनंजय देशमुख यांना अतिरिक्त सुरक्षा पुरवा

### आता आर पारची लढाई लढणार

गृहमंत्र्यांना एक निवेदन तयार करू त्यावरती गृहमंत्री काय उत्तर देतात त्यावर वाट पाहूआठ दिवसाची मुदत त्यांना देऊ आणि त्यानंतर आपलं आंदोलन करू. गृह मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद नाही दिला तर तीव्र आंदोलन करू. त्याचबरोबर राज्यपालांना ही निवेदन जन संदर्भात चर्चा झाली आवादा कंपनीची भूमिका अद्याप पर्यंत समोर आलेली नाही ती भूमिका देखील समोर आली पाहिजे. ▶▶पान २ वर

# सुप्रिया सुळेंचा बीड दौरा
## मस्साजोग आणि परळीला जाणार

**बारामती । वृत्तसेवा**

मी उद्या मस्साजोग आणि परळीला पण जाणार आहे. माझं बजरंग आप्पा सोनावणे यांच्याशी बोलणं झालं आहे. बीड जिल्ह्यात तिथे जे खून झालेले आहेत, त्यावर गेले दोन महिने आरोप प्रत्यारोप होत आहेत. पण जे सत्य आहे ते कुठेच बाहेर येताना दिसत नाही. मला अस्वस्थता वाटते की, महादेव मुंडे आणि संतोष देशमुख कुटुंबातील लोक न्याय मागत आहेत. दोन्ही कुटुंबाला न्याय मिळत नाही. त्यामुळे मी उद्या परळीलाही जाणार आहे. दोन्ही ठिकाणी जाऊन माहिती घेणार आहे. जवळपास ७० दिवस व्हायला आले, मग पाचवा खुनी कुठे आहे? चौकशी कसली सुरु आहे? हे सर्व पारदर्शकपणे राज्याला आणि देशाला समजलं पाहिजे. जेव्हा मनमोहन सिंग साहेब प्रधानमंत्री होते, तेव्हा पीएमएलएचा कायदा केला, त्यात खंडणी हा गुन्हा आहे आणि त्याला ईडी आणि सीबीआय लागतं. मग या सर्व प्रक्रियेत ईडी आणि सीबीआयचा सहभाग का दिसला नाही? तिथे काय सुरु आहे, याची आम्हाला माहिती का मिळत नाहीय?, असे सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केले आहेत. सुप्रिया सुळे पत्रकार परिषदेत म्हणाल्या, ▶▶पान २ वर



# नांदूरघाटमध्ये सापडले एक किलो सोने
## अनिल बडेंच्या घरावर तामिळनाडू पोलिसांची छापेमारी

**नांदूरघाट । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नांदूरघाटमध्ये तब्बल एक किलो सोने सापडले आहे. तामिळनाडू पोलिसांनी सोमवारी सकाळी सोन्याचे दुकानदार अनिल बडे यांच्या घरावर छापेमारी केली आहे. पोलिस आल्याचे दिसताच बडे घराच्या छतावरून उडी मारून फरार झाले आहेत. चोरट्यांनी दरोड्यातील एक किलो २०० ग्रॅम सोने बडेंना विक्री केले होते. या सोन्याची किंमत एक कोटींच्या घरात आहे. बडेंनी चोरट्यांसोबत २५ लाख रूपयांची डिल केली होती. त्यापैकी चौदा लाख रूपये चोरट्यांना दिले होते. उर्वरित ११ लाख रूपये देणे बाकी होते. मात्र सदर चोरट्यांनी पकडून तामिळनाडू पोलिसांनी बडेंच्या घरावर छापेमारी केली आहे. या छापेमारीमुळे नांदूरघाटसह संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. या छापेमारी दरम्यान तामिळनाडू पोलिसांसह केजचे पोलिस उपनिरीक्षक आनंद शिंदे, नांदूर घाट चौकीचे पाशा शेख, राजू वंजारे, शमीम पाशा यांच्यासह इतर कर्मचार्यांची उपस्थिती होती. मागच्या दोन दिवसांपासून तामिळनाडू पोलिस पकडलेल्या चोरट्यांना घेवून नांदूरघाटमध्ये तळ ठोकून आहेत. विशेष म्हणजे ते गाडीला खोटा नंबर लावून पोलिसांनी ही मोठी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

**पोलिस येताच बडे फरार, चोरट्यांनी दरोड्यातील सोने विक्री केले होते बडेंना, जप्त केलेल्या सोन्याची किंमत एक कोटींच्या घरात**



# संतोष देशमुखांच्या हत्येत भाजपचा हात?



**मुंबई । वृत्तसेवा**

मागील काही दिवसांपासून बीडमधील राजकीय वातावरण तापलं आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष

## धसांचा उल्लेख करत राऊतांचं मोठं विधान

देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून राजकीय आरोप प्रत्यारोप केले जात आहे. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी काही दिवसांपूर्वी संतोष देशमुख यांना न्याय मिळावा, यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी बीडसह राज्यात विविध ठिकाणी भाषणं करत या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मीक कराडसह कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडेंना टार्गेट केलं. मात्र अलीकडेच त्यांनी गुप्तपणे धनंजय मुंडे यांची भेट घेतली आहे. यामुळे या प्रकरणात नवा ट्वीस्ट निर्माण झाला आहे. ▶▶पान २ वर

# बीडमध्ये चाललंय काय?
## जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त, कोर्टाचे आदेश

**माजलगाव । प्रतिनिधी**

चिखल बीड (ता. वडवणी) येथील शेतकऱ्यांची जमीन तलावात गेलेल्या जमिनीचा संपूर्ण मावेजा १० वर्षांनंतरही दिला नाही. यामुळे माजलगाव न्यायालयाच्या आदेशाने थेट जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले होते. या आदेशावरून सोमवारी (ता. १७) जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करून न्यायालयात जमा केल्याने खळबळ उडाली आहे. वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील शेतकरी शिवाजी टोगे, संतोष टोगे व बाबू मुंडे या शेतकऱ्यांची जमीन लघु सिंचन तलावासाठी शासनाने संपादित केली होती व या जमिनीचा अत्यंत तुटपुंजा मावेजा त्यांना देण्यात आला होता. त्यामुळे या शेतकऱ्यांनी माजलगाव येथील सत्र न्यायालयात धाव घेत यासाठी दावा दाखल केला होता. या दाव्यावर न्यायालयाने संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे अंशतः मान्य करून ऑक्टोबर २०१५ मध्ये या शेतकऱ्यांना वाढीव मावेजा द्यावा असा निकाल दिला होता. मात्र शासनाने काही प्रमाणात रक्कम देऊन संपूर्ण रक्कम देण्यास चालढकल केली. त्यामुळे माजलगाव न्यायालयाचे सह. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. पी. बुधवंत यांनी सदर रकमेला व्याज लावून सदर रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दहा दिवसापूर्वी पारित केले होते. त्यानुसार कोर्टाने वादी यांचे वकील यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी यांना मावेजा बाबत सोमवारी आपली बाजू मांडली व रक्कम अदा करणे बाबत सांगितले; परंतु जिल्हाधिकारी यांनी पैशाची पूर्तता करू शकत नाही तुम्ही गाडी घेऊन जा, असे सांगितल्याने कोर्टाच्या बेलीपने जिल्हाधिकारी ▶▶पान २ वर



साहित्य संमेलनाच्या विचार पिठाला
# आण्णाभाऊ साठे यांचे नाव
## अजिंक्य चांदणे म्हणाले डीपीआयच्या लढ्याला यश



**बीड । प्रतिनिधी**

देशाची राजधानी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे. त्या साहित्य संमेलनाच्या महत्वाच्या स्थळाला साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात येणार आहे. तसे पत्र अखिल भारतीय साहित्य मंडळाकडून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाला देण्यात आले आहे.अशी माहिती डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. बीड शहरातील हॉटेल निलकमल येथे सोमवार (दि.१७) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ▶▶पान २ वर

# नवे नियम, नव्या अटी
## लाडक्या बहिणींसाठी सरकारचा मोठा निर्णय!

**मुंबई । वृत्तसेवा**

महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेल्या लाडकी बहीण योजनेची मागील काही महिन्यांपासून प्रचंड क्रेझ आहे. लाडक्या बहिणी आता आठवा हफ्ता येण्याची वाट बघत असतानाच. या योजनेतून नुकतेच पाच लाखापेक्षा जास्त बहिणींना वगळण्यात आले आहे. राज्याच्या तिजोरीवरचा बोजा ▶▶पान २ वर

# पीक विम्यासाठी किसान सभेचे धरणे



**बीड । प्रतिनिधी**

२०२३ २०२४ खरीप व रब्बी पीकविमा जोपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत नाही तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन सुरुच राहणार, असे म्हरत शेकडो शेतकऱ्यांनी जालना रोडवरील भारतीय कृषी विमा कंपनीच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन ▶▶पान २ वर

पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडेंनी
# बिंदुसरा नदीचे पुनरज्जीवन करावे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे. बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकाम तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत कचरा टाकणे तसेच जैविक कचरा यामुळे नदीचे प्रदुषण होत असुन बीडकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. बिंदुसरा नदीच्या प्रदूषणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी ▶▶पान २ वर

**बिंदुसरा नदी प्रदुषण व अतिक्रमण मुक्त करा मागणीसाठी बिंदुसरा नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन**



कर्जत जामखेडच्या मातीत
# महाराष्ट्र केसरीचा धुरळा उडणार

**पुणे । वृत्तसेवा**

नुकत्याच पार पडलेल्या ६७ व्या राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी स्पर्धेला वादाचे गालबोट लागले. महाराष्ट्र केसरी किताबी लढतीसाठी पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यादरम्यान कुस्ती झाली. या लढतीत पृथ्वीराज मोहोळला विजयी ठरवले गेल्याने, पंचांच्या निर्णयाविरोधात मोठा वाद निर्माण झाला. अगदी पंचांवर लाथ उगारण्यासारखी चूक राक्षेकडून संतापाच्या भरात घडली. पंचांच्या चुकीच्या निर्णयामुळे एका वेगळ्या मतप्रवाहाने समोर येऊन कुस्तीत राजकारण होत असल्याचा आरोप केला. याच पार्श्वभूमीवर शरद पवार आणि कुस्तीगीर संघाची मान्यता असेल तर लवकरच कुस्तीचा आखाडा भरवू, अशी घोषणा ▶▶पान २ वर




CMYK

# ‘चर्चापे परीक्षा’



यादीत नसलेली ‘एफ-३५’ विमाने, अन्य विमानांची ‘जीई ४१४’ इंजिने, स्ट्राईकर युद्ध वाहने, प्रीडेटर ड्रोन्स, अमेरिकी तेल, नैसर्गिक वायू, द्रवीभूत वायू, लहान अणुभट्ट्या, रोबो आणि आर्टिफिशल इंटेलिजन्ससाठी आवश्यक सामग्री, संरक्षणसिद्धतेसाठी महत्त्वाचे सोर्सकोडविरहित तंत्रज्ञान, क्वांटम/बायोटेक/सेमीकंडक्टर्ससाठी घटक, अमेरिकी बॉर्बन व्हिस्की आणि अमेरिकी वाइन्सवरील करकपात, पुढील काळासाठी ‘ट्रस्ट’ (ट्रान्सफॉर्मिंग रिलेशनशिप युटिलायझिंग स्ट्रॅटेजिक टेक्नॉलॉजीस) हा कालबद्ध कार्यक्रम इत्यादी इत्यादी अनेक घटक अमेरिकेकडून खरेदी करण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात आपण मान्यता दिली. हे सर्व अमेरिकेस मिळणार आणि आपणास २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी तहव्वुर राणा दिला जाणार. या सगळ्यांच्या बरोबरीने भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार तूट अमेरिकेच्या बाजूने कमी केली जावी ही अमेरिकेची अटही आपण मान्य केली. तेव्हा हे सर्व आपणास ‘मिळणार’ असल्याने पंतप्रधान मोदी यांच्या या अमेरिका दौऱ्याचे यश आपण ते साजरे करूच. ते करताना एखाद्यास हवे ते देणे आणि नको असतानाही घ्या घ्या म्हणत घ्यायला लावणे यातील सूक्ष्म भेद लक्षात घेण्याचे भान जनसामान्यांस असण्याची काही गरज नाही. हे वास्तव लक्षात घेऊन या दौऱ्याच्या फलिताची चर्चा व्हायला हवी. नाही म्हणायला अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा विराजमान झाल्यानंतर त्या देशास भेट देणारे मोदी हे फक्त चौथे राष्ट्रप्रमुख ही बाब महत्त्वाचीच. त्यांच्या आधी इस्रायल, जपान, जॉर्डन या तीनच देशांचे प्रमुख ट्रम्प यांच्या दरबारात हजेरी लावते झाले. यातील इस्रायल हे अमेरिकेचे उपांग, जपान हा अमेरिकेचा संरक्षण क्षेत्रातील अंकित आणि जॉर्डन हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील वजनरहित देश हे सत्य लक्षात घेता ट्रम्प यांचा पाहुणचार घेणारे मोदी हे पहिलेच बडे-देशप्रमुख ठरतात. तेव्हा ट्रम्प यांच्या कराल कर-वरवंट्याखाली आपण सापडू नये म्हणून ही भेट महत्त्वाची होती. त्याआधी ट्रम्प सत्तारूढ झाल्या झाल्या आपण बेकायदा भारतीयांस परत घेणे, अमेरिकेकडून अधिक खनिज तेल तसेच त्या देशाच्या अणुभट्ट्या अधिकाधिक खरेदी करणे यांस मान्यता देऊन संघर्षापेक्षा सहकार्यात आपणास अधिक रस असल्याचे दाखवून दिलेच होते. त्यामुळे मोदींच्या या भेटीत हे सहकार्य अधिक दृढ करण्यावर (पक्षी : अधिकाधिक अमेरिकी माल खरेदी करण्यावर) भर दिला जाईल हे दिसत होतेच. तसेच झाले. गेले दोन महिने ट्रम्प-संक्रांत टाळण्यासाठी आपण जे जे करीत होतो ते सर्व करण्यावर या भेटीत शिक्कामोर्तब तर झालेच. पण जे करण्याची आपली उघड तयारी नव्हती ते करण्यासही या दौऱ्यात आपण मान्यता दिली. (मानावयाचे असल्यास) हे या दौऱ्याचे यश. उदाहरणार्थ ‘एफ ३५’ विमाने वा अमेरिकी नैसर्गिक वायू वा अमेरिकी व्हिस्की वा अन्य काही संरक्षण तसेच ‘एआय’ सामग्री. अमेरिकी भूमीवर पाऊल ठेवण्याआधी फ्रान्सच्या दौऱ्यात आपण त्या देशाकडून राफेल विमाने आणि अणुभट्ट्या घेण्याबाबत आणखी एक पाऊल पुढे टाकले होते. आता आपणास ‘एफ ३५’ विमानेही घ्यावी लागणार आणि अमेरिकी अणुभट्ट्याही! राफेल विमानांबाबत फ्रान्सकडून आपणास निर्मितीचे तंत्रज्ञानही मिळणार आहे. ‘एफ ३५’बाबत याची स्पष्टता नाही. तसेच अन्य गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाबाबत आपणास ‘सोर्स कोड’ देण्याबाबतही स्पष्टता नाही. शक्यता ही की अमेरिका फक्त वस्तू विकेल; ते बनवण्याचे तंत्रज्ञान स्वत:कडेच राखेल. राफेलप्रमाणेच मोदी यांनी फ्रान्स दौऱ्यात ‘एआय’बाबतही बरेच काही भाष्य केले होते. त्या मुद्द्यावरही अमेरिकेत आपणास अधिक खरेदी आश्वासने द्यावी लागली. सामान्य माणसाच्या भाषेत बोलावयाचे तर महिन्याच्या वाणसामानाची खरेदी झालेली असतानाही घरमालकाने नवीन दुकान काढले म्हणून त्याच्या ‘प्रेमळ आग्रहा’खातर सर्व काही पुन्हा खरेदी करावे लागावे; तसे हे झाले म्हणायचे. त्याच घरगुती भाषेत बोलावयाचे तर ही खरेदी काही वाया जात नाही; पण खर्च दुप्पट होतो इतकेच. ट्रम्प यांस हेच हवे आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापारतूट १०,००० कोटी डॉलर्स (१०० बिलियन) आहे असे ट्रम्प म्हणतात. अमेरिकी माध्यमेच हा आकडा अतिरंजित असल्याचे म्हणतात. त्यांच्या मते ही तूट पाच हजार कोटी डॉलर्स असावी. ट्रम्प ती कमी करू पाहतात. म्हणजे आपण जितक्या रकमेच्या वस्तू अमेरिकेकडून खरेदी करतो त्यापेक्षा अधिक रकमेच्या वस्तू अमेरिका आपल्याकडून खरेदी करते. त्यामुळे भारताचे अधिक भले होते. ट्रम्प यात बरोबरी आणू पाहतात. त्याची सुरुवात म्हणून ही व्यापारतूट ३५०० कोटी डॉलर्सने कमी करण्याचे आश्वासन आपण दिले. म्हणजे इतक्या रकमेच्या मालाची अतिरिक्त खरेदी आपण अमेरिकेकडून करणार. इतकेच नाही. मोदी अमेरिकेत पाऊल टाकत असतानाच ट्रम्प यांनी कर आकारणी ‘बरोबरीने’ (रेसिप्रोकल) करण्याची घोषणा केली. हा आपणास थेट इशारा. याचा अर्थ भारत यापुढे अमेरिकी उत्पादनांवर जितका कर लावेल तितकाच कर अमेरिका आता भारतीय उत्पादनांवर लावेल. ‘‘भारतीय व्यापाराची आता मला चिंता नाही. ते जितका कर लावतील तितकाच कर त्यांच्यावर आकारला जाईल’’ अशा अर्थाचे उद्गार ट्रम्प यांनी आपल्या नेहमीच्या झोकात पंतप्रधानांच्या बाजूला उभे राहून काढले. भारत-अमेरिका व्यापारी संबंधांचा आकार यापुढे कसा असेल ते सांगण्यास ट्रम्प यांची ही देहबोली पुरेशी होती. मोदी यांच्या या दौऱ्यात ट्रम्प यांचा आर्थिक तसेच सामारिक विजय आहे तो अमेरिकी तेल आणि नैसर्गिक वायूस भारतीय बाजारपेठ मिळवून देण्यात. ऊर्जा गरजांत स्वयंपूर्ण होण्यासाठी अमेरिकेने ९/११ घडल्यानंतर मोठी गुंतवणूक केली. त्यातून फ्रॅकिंगसारखे तंत्रज्ञान विकसित झाले. त्यामुळे अमेरिकेत अक्षरश: खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांचा महापूर आला. त्याचवेळी करोनादी संकटामुळे खनिज तेलाचा बाजार उठला. सुमारे ३०० हून अधिक अमेरिकी कंपन्या एका दिवसात दिवाळखोरीत गेल्या. नंतर सर्व सुरळीत झाले असले तरी या अतिरिक्त खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे करायचे काय हा प्रश्न अमेरिकेपुढे आहे. तो आपण सोडवला. ही झाली आर्थिक बाब. यातील सामरिक मुद्दा आहे तो भारतास खनिज तेल आणि वायूच्या मुद्द्यावर रशियापासून दूर करण्याचा. ‘‘अमेरिका आपला सर्वात मोठा ऊर्जा पुरवठादार असेल’’ असे आपण मान्य केले त्याचा खरा अर्थ रशियाचे महत्त्व कमी होईल, असा होतो. आंतरराष्ट्रीय माध्यमांनी या दौऱ्यावर भाष्य करताना उभय नेत्यांनी गुंतागुंतीच्या विषयांस स्पर्श करणे कसे टाळले याचे रसभरीत वर्णन केले. तेही या दौऱ्याचे यशच म्हणायचे. उदाहरणार्थ भारतीय घुसखोरांची असभ्य पद्धतीने पाठवणी. या भारतीय घुसखोरांस बेड्या घालून, साखळीत बांधून पाठवले जाते. तसे करण्याची काहीच गरज नाही. ते काही गुन्हेगार नव्हेत. हा मुद्दा अमेरिका दौऱ्यात मोदी हे अध्यक्ष ट्रम्प यांच्यासमोर उपस्थित करतील अशी अपेक्षा होती. तसे काही झाल्याचे दिसत नाही. झाले असते तर त्याचे डिंडिम कानावर आले असते. हा मानवतेचा मुद्दा या भेटीत का चर्चिला गेला नाही, हा प्रश्नच. न जाणो ट्रम्प काही वेडेवाकडे बोलायचे, अशी भीती असावी. बाकी ट्रम्प यांच्या ‘मागा’स आपल्या पंतप्रधानांनी ‘मिगा’ने उत्तर देत शब्दचातुर्याबाबत ‘मेगा’यश मिळवले ही खचितच अभिमानाची बाब. ट्रम्प यांनी पंतप्रधानांस ‘तुम्ही महान आहात’ असे शिफारसपत्र दिले हीदेखील ‘मेगा’ कौतुक करावे अशी घटना. खरे तर ट्रम्प यांचा बेभरवशीपणा लक्षात घेता त्यांच्याशी चर्चा करणे हीच परीक्षा. या दौऱ्याआधी पंतप्रधानांनी भारतीय विद्यार्थ्यांशी ‘परीक्षापे चर्चा’ केली. अमेरिका दौऱ्यात ‘चर्चापे परीक्षा’ झाली. ती किती कठीण होती ते मोदी-ट्रम्प यांची पत्रकार परिषद ज्यांनी पाहिली त्यांस कळेल. पण तीमधून आपण यशस्वी सुटलो असे मानण्यास हरकत नाही.

# फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर पिंपळा धायगुडा येथे संपन्न

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी फार्मसी महाविद्यालयाचे अंबाजोगाई तालुक्यातील पिंपळा धायगुडा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दि ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाले. या साप्ताहिक सेवा योजना शीबिरात विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना निर्माण झाल्याचे पहावयास मिळाले. ९ ते १५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान धायगुडा पिंपळा या गावात हे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ग्रामस्वच्छता, समाजप्रबोधन, आरोग्य तपासणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पिंपळा गावकऱ्यांनी देखील मोठा उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला. गावकऱ्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे महाविद्यालयाचे शिबिर यशस्वी झाले. शिबिराच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी अशा या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक



बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात वाढ होण्यास मदत होत असल्याची भावना व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजना स्वच्छता अभियान हा भारतीय विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे असेही मत प्राचार्य तरके यांनी मांडले. हे अभियान विशेषतः स्वच्छ भारत मिशन (उश्रशरप खपवळर चळीीळेप) च्या उद्देशाला सहाय्यक ठरते. छडड अंतर्गत स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी केली जाते ज्यामध्ये विद्यार्थ्यांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित केले जाते. ह्या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख एम. ए. कुरेशी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या महत्त्वाची जाणीव करून दिली. तसेच त्यानी विद्यार्थ्यांच्या मदतीने धायगुडा पिंपळा या गावातील सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालय आणि इतर सार्वजनिक क्षेत्र स्वच्छ केली. पर्यावरणीय साफसफाई आणि कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी उपाय तयार करण्यासाठी लोकांना प्रेरित केले. तसेच स्वच्छते संबंधी असणाऱ्या नियमांची ओळख व माहिती गावकऱ्यांना करवून दिली. त्याचबरोबर त्यावर कार्यवाही करत सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय विकासात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये एकता निर्माण केली. या साप्ताहिक राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांनी धायगुडा पिंपळा या गावातील जीवन आधार वृद्धाश्रम या ठिकाणी देखील भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांचा विरंगुळा व मनोरंजन होण्यासाठी भक्ती गीते सादर केली. सोबतच परिसारतीची स्वच्छता केली. वृद्धापकाळातील निराधार व्यक्तींसाठी असलेला हा आश्रम आश्रयस्थान असल्याचे येथील वृद्धांनी सांगितले. या दरम्यान त्यांना औषधांची माहिती दिली. हे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर संपन्न करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख एम.ए.कुरेशी यांनीं पुढाकार घेतला व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

# राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या



पणे, (वृत्तसेवा):-राज्यात उन्हाच्या झळा वाढल्याने कमाल तापमानाचा पारा ३६ अंशांपार पोचला आहे. सोमवारी (ता. १७) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये सोलापूर येथे राज्यातील उच्चांकी ३७.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्याच्या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सोमवारी (ता. १७) हरियानाच्या रोहतक येथे देशाच्या सपाट भूभागावरील नीचांकी ८.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर राज्यात निफाड येथील गहू संशोधन केंद्रात राज्यातील नीचांकी ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उर्वरित राज्यात बहुतांश ठिकाणी किमान तापमान १० ते २२ अंशांच्या दरम्यान होते. राज्याच्या कमाल तापमानात वाढ होत असून, रविवारी (ता. १६) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये सोलापूरसह मध्य महाराष्ट्रातील जेऊर, सांगली, मराठवाड्यातील परभणी, विदर्भातील ब्रह्मपुरी, अकोला, नागपूर, चंद्रपूर, वर्धा येथे कमाल तापमान ३६ अंशांवर होते. उन्हाच्या झळा चांगल्याच वाढल्या असून, उकाड्यामुळे घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. आज (ता. १८) कमाल आणि किमान तापमानात १ ते २ अंशांची वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

## पान १ वरून

### सरपंच अण्णासाठी...

दिसत नाही. त्यामुळे आता आपल्या गावच्या सरपंच अण्णाच्या न्यायासाठी मसाजोगच्या गावकऱ्यांची टोकाची भूमिका घेतली आहे. प्रशासनावर विश्वास नाही आपण सर्वजण मिळून राज्यपालाची भेट घेऊ तसेच मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यावर विश्वास राहिला नाही, अशी देखील चर्चा यावेळी झाली. आजच्या बैठकीत सर्व गावकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन करण्या संदर्भांत चर्चा झाली. आंदोलनावर गावकऱ्यांचे एकमत झाले आहे. न्याय मिळेपर्यंत अन्नत्याग आंदोलन करायचे, यावर गावकऱ्यांनी हात वर करून अनुमोदन दिले आहे. ग्रामस्थांनी अगोदर एक दिवसाचा लाक्षणिक उपोषण करणार आहे. प्रशासन आलं तर त्यांना सांगू मंत्रालयावर जाऊन सर्व गावकऱ्यांनी आत्मदहन करायचं. थेट मंत्रालयावर आंदोलन करण्याची गावकऱ्याच्या बैठकीत चर्चा झाली. २५ फेब्रुवारीपर्यंत प्रशासनाला अल्टिमेटम त्यानंतर अन्नत्याग आंदोलन करण्यावर गावकरी ठाम असून पुढील आंदोलनाची दिशा ठरली.

### आता आर पारची...

खंडणी प्रकरणात त्यांनी पण पुरावे प्रशासनाला दिले पाहिजेत. गृहमंत्री मुख्यमंत्री कोणीही असो आम्ही मागे सरकणार नाही, असे गावकरी म्हणाले.

### संतोष देशमुखांच्या...

सुरेश धस यांनी संतोष देशमुखांना न्याय मिळावा, यासाठी उभारलेला लढा कॉम्प्रोमाईज केला, असा आरोप त्यांच्यावर झाला. यावर स्वत: धस यांनी स्पष्टीकरण देत, आपण कसलंही कॉम्प्रोमाईज केलं नाही, असं स्पष्टीकरण दिलं. तसेच त्यांनी पुन्हा एकदा धनंजय मुंडेविरोधात आघाडी उघडली आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा प्रश्न उपस्थित केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि त्यावरून होणाऱ्या राजकारणावर भाष्य करताना संजय राऊत म्हणाले, मराठा समाजात मनोज जरांगे पाटील यांचं जे नेतृत्व उभं राहिलं. त्यांनी निवडणुकीनंतर जे आंदोलन करायला सुरुवात केली. त्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने सुरेश धस नावाचा मराठा समाजाचा मोहरा पुढे आणला. त्यासाठी त्यांनी संतोष देशमुख यांच्या खुनाचा त्यांनी वापर केला. त्यामुळे संतोष देशमुखांचा खून करण्यात भाजपचा हात आहे का? असा माझा प्रश्न आहे. लोकांचं लक्ष विचलित करण्यासाठी हे कृत्य घडवून आणलं का? हे पाहावं लागेल, असंही राऊत म्हणाले.

### सुप्रिया सुळेंचा...

देशमुख आणि मुंडे कुटुंबाला न्याय हा मिळालाच पाहिजे. दोन्ही घरात जो खून झालेला आहे, त्या कुटुंबातील महिलांना आणि माऊलींना न्याय हा मिळालाच पाहिजे.अंजली दमानीया आणि सुरेश धसांनी जे आरोप केले आहेत, त्याची कागदपत्रेही सरकारला दिली आहेत. अंजली दमानीया आणि सुरेश धस पुण्याचे आणि बीडचे पालकमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री या दोघांनाही भेटले आहेत. त्यांनी सर्व कागदपत्रे डीसीएम आणि सीएम या दोघांनाही दाखवलेले आहेत. ज्या महाराष्ट्रात खंडणी, खून झाला, पवार साहेबांनी महिलांसाठी या महाराष्ट्रात धोरण आणलं. या छत्रपतींच्या आणि शाहू-फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात भारतीय संस्कृतीत प्रत्येक महिलेला आईच्या जागेवर ठेवलं जातं. अशा महिलांची कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणही समोर येतात. अशी भयानक परिस्थिती आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींची पारदर्शकपणे चर्चा झालीच पाहजे. पारदर्शकपणे सरकारला खरं कळलं पाहिजे आणि या सरकारने नैतिकता दाखवली पाहिजे. ही आमची आग्रहाची भूमिका आहे. उपमुख्यमंत्र्यांचं (अजित पवार) यांची प्रतिक्रिया मी काल पाहिली. त्यांच्यावर जेव्हा आरोप झाले होते, तेव्हा नैतिकतेने त्यांनी राजीनामा दिला होता, असा त्यांनी उल्लेख केला. ही गोष्ट खरी आहे. तेव्हा पक्ष एक होता. छगन भुजबळ, अशोक चव्हाण, आर आर पाटील यांनीही नैतिकता म्हणून त्यांनी राजीनामा दिला होता. अजित पवारांनीही नैतिकता म्हणून राजीनामा दिला होता. तोच आदर्श ठेऊन बाकीच्या लोकांनी वागावं, एवढीच आमची अपेक्षा आहे. चौकशी पारदर्शकपणे व्हावी, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### पीक विम्यासाठी...

सुरू केले आहेत. सदरच्या आंदोलनाचं नेतृत्व महाराष्ट्र राज्य किसान सभा बीडच्या वतीने करण्यात येत आहे. बीड शहरातल्या जालना रोडवर असलेल्या भारतीय कृषी विमा कंपनीच्या कार्यालयासमोर हजारो शेतकऱ्यांनी ठिय्या मांडत धरणे आंदोलनाला सुरुवात केली आहे. जिल्हा व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनात महाराष्ट्र राज्य किसान सभेने म्हटले आहे. २०२३-२४ सालच्या खरीप व रब्बी पिकाचा विमा जोपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार नाही, तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरू राहणार. सदरच्या आंदोलनाचे नेतृत्व ॲड. अजय बुरांडे, काशीनाथ सिरसट, कॉ. अशोक डाके, यांच्यासह आदींनी सुरू केले आहे.

### बीडमध्ये चाललंय...

यांची गाडी क्रमांक एम एच २३ बीसी २४०१ ही गाडी कायदेशीर बाबीची पूर्तता करून जप्त करून माजलगाव न्यायालयात जमा केली आहे. शेतकऱ्यांच्या वतीने ॲड बाबुराव तिडके, एस.एस.मुंडे यांनी बाजू मांडली.

### साहित्य संमेलनाच्या...

अजिंक्य चांदणे बोलत होते. या पत्रकार परिषदेला उत्तम पवार, बाप्पा सोनवणे, सुभाष लोणके, नवनाथ कांबळे, विजय चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की, दिल्लीत येत्या दि.२१,२२, २३ या कालावधीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असून स्वागताध्यक्ष म्हणून शरदचंद्र पवार असणार आहेत. अजिंक्य चांदणे असंही म्हणाले की,मराठी साहित्यात आण्णाभाऊ साठे यांचे नाव अग्रगण्य असेच आहे. त्यांच्या फकिरा कादंबरी जगातील २७ भाषांमध्ये भाषांतरीत झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची साहित्य संमेलनात दखल घेतली जावी, यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून राज्यातील बीड,सातारा, कोल्हापूर, सांगली, वाशीम, लातूर, जालना, छत्रपती संभाजी नगर,बुलढाणा आशा विविध जिल्ह्यात या विषयाच्या अनुषंगाने आंदोलने झाली.संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत साहित्य मंडळ पुणे यांना लेखी निवेदने देण्यात आली होती. या चळवळीला व आंदोलनांना योग्य प्रतिसाद देत साहित्य मंडळाने आमच्या आंदोलनाची व मागणीची दखल घेत, पक्षाच्या नावाने पत्र जाहीर करून अण्णाभाऊंचा यथोचित सन्मान केला जाईल असे कळवले आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद घेऊन आम्ही साहित्य मंडळ पुणे व संमेलनाचे स्वागत अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे आभार व्यक्त करत आहोत.तसेच हा लढा यशस्वी करणाऱ्या सर्व अण्णाभाऊ साठे अनुयायांचे, पक्ष पदाधिकाऱ्यांचेही आम्ही आभार व्यक्त करत आहोत.असे अजिंक्य चांदणे म्हणाले. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्यात अतिशय मोठे स्थान आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वाटेगाव या जन्मगावी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविले जावे. या मागणीसाठी आपण साहित्य मंडळाकडे मागणी करणार आहोत. असे स्पष्टीकरण डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिले. साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य,१३ कथा संग्रह, १० पोवाडे, ७ चित्रपट कथा, १ प्रवास वर्णन असा मराठीचा खजिना तयार केला. आण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी जगातल्या २७ भाषांमध्ये भाषांतरीत आहे.

### पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई...

सकाळी बिंदुसरा नदीवरील दगडी पुल नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री, वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितजी पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन आदी सहभागी होते. बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी कचरा व जैविक कचरा टाकण्यात आला आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नदीचे प्रदुषण झाले आहे. त्यामुळे बीड शहरातील बिंदुसरा नदी प्रकल्पाचा आढावा घेऊन बिंदुसरा नदीपात्रातील भुमाफियांकडुन होणारे अतिक्रमित बांधकाम, बिंदुसरा नदीपात्रात मनपा कर्मचाऱ्यांमार्फत टाकला जाणारा कचरा तसेच जैविक कचरा यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात असुन भविष्यात १९८९ सारखी पुरस्थिती निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जिवितहानी होऊ शकते यासाठी नगरपरिषदेने सीमारेषा आखुन फ्लड झोन,ग्रीन झोन,रेड झोन, यल्लो झोन आदी बाबत उपाययोजना करण्यात यावी. पूररेषेच्या आत असणारी अतिक्रमित बांधकाम प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

### नवे नियम...

कमी करण्यासाठी वित्त विभागाने सरकारी खर्चात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहीण योजनेत बोगस लाभार्थ्यांची संख्या बरीच आहे. त्यामुळे अपात्र बहिणांना या योजनेतून वगळण्याचे काम सुरुच आहे. आता यासाठी नवीन नियम करण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या तिजोरीवरील भार वाढवण्याऱ्या या योजनेचा गैरवापर टाळण्यासाठी सरकारने नवी नियमावली तयार करण्यात येणार आहेत. त्यानुसार आता लाभार्थ्यांच्या आयकर खात्याकडील नोंदी तपासून छाननी केली जाणार आहे. लाडक्या बहिणींच्या उत्पन्नाची शाहनिशा करण्यासाठी त्यांची दरवर्षी ए-घधउ करण्यात येणार आहे. गरजू लाडक्या बहिणींनाच या योजनेचा लाभ मिळावा यासाठी कोणते नवे नियम लागू केले जाणार आहेत ते पाहूयात... काय आहेत नवी नियम? * लाभार्थी महिलांना आता दरवर्षी १ जून ते १ जुलै दरम्यान केवायसी करणे अनिवार्य केले आहे. * तसेच राज्य सरकारने लाभार्थी महिलांची पात्रता तपासण्यासाठी आयकर विभागाची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. *‘लाडकी’वर आता आयटीची नजर आहे. लाडक्या बहिणींचे इन्कम टॅक्स रेकॉर्ड तपासणार आहे. * लाभार्थी हयात आहे की नाही याची तपासणी होणार आहे. * अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास लाभ मिळणार नाही. * जिल्हास्तरावरून फेरतपासणी करुन निकषात न बसलेल्यांना अपात्र करण्यात येणार आहे.

### कर्जत जामखेडच्या...

आमदार रोहित पवार यांनी केली होती. त्यानुसार रोहित पवार यांनी महाराष्ट्र केसरी स्पर्धेची नवी चूल मांडली आहे. शिवराज राक्षे आणि पृथ्वीराज मोहोळ मोहोळ यांच्यादरम्यान झालेल्या कुस्तीवेळी पंचांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य कुस्तीगिर संघाने किताबी लढतीची सखोल चौकशी करण्यासाठी तज्ज्ञ समितीची नेमणूक केली आहे. त्याच्या दोन दिवसांनंतर लगोलग कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन नव्या स्पर्धेची घोषणा केली. * ५ दिवस स्पर्धा चालणारः रोहित पवार यांनी याच पत्रकार परिषदेत अहिल्यानगरमध्येच कुस्तीचा आखाडा भरविण्याची घोषणा केली. शरद पवार यांच्या संघटनेची कुस्ती स्पर्धा अहिल्यानगरच्या कर्जतमध्ये होणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. कर्जत शहरातील दादा पाटील महाविद्यालयाच्या बाजूला भव्य आखाड्यात कुस्त्यांचे जंगी सामने पार पडतील. २६, २७, २८, २९, ३० मार्च २०२५ रोजी हे सामने होतील, असे रोहित पवार यांनी जाहीर केले. यावेळी त्यांनी राक्षे आणि गायकवाडलाही स्पर्धेत सहभाग घेता येईल, असे नमूद केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# IFFCO ने ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म वरून त्यांची उत्पादने विक्री करण्यास याआधीच घातलेली आहे बंदी

## अंजली दमानिया यांनी नॅनो खतांच्या ऑनलाईन खरेदीवरून केलेले खोटे आरोप आणि वस्तुस्थिती

**मुंबई । प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर सर्वात मोठी खतांची सहकारी संस्था खत्रङ्मऊज ने याआधीच लेखी स्वरूपात स्पष्ट केलेले आहे की कोणत्याही ई – कॉमर्स प्लॅटफॉर्मला खत्रङ्मऊज ची उत्पादने विकण्याचा अधिकार नाही. अनधिकृत ऑनलाईन प्लॅटफॉर्म वरून खरेदी करण्यात येणारी खत्रङ्मऊज ची उत्पादने ही संपूर्णतः खरेदीदारांच्या जबाबदारीवर आहेत. सदर प्लॅटफॉर्म गैरवाजवी किंमतीत ही उत्पादने अनधिकृतरित्या विकतात. ऑनलाईन खतविक्री बाबतच्या केंद्र सरकारच्या नियमानुसार '' एफ सी ओ परवाना किंवा खत्रङ्मऊज कडून अनिवार्य असलेला 'ओ फॉर्म' नसलेल्या कोणत्याही संस्थेस उत्पादने विक्री करण्यास मनाई घातलेली असून असे केल्यास त्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार खत्रङ्मऊज ने राखून ठेवलेला आहे. याबाबत खत्रङ्मऊज ने वेळोवेळी प्रेस नोट काढून माध्यमांना देखील माहिती दिलेली आहे. खत्रङ्मऊज कंपनीच्या सर्व उत्पादनांची विक्री किंमत ही संपूर्ण देशात सारखीच आहे. मात्र काही कमर्शिअल ई – कॉमर्स प्लॅटफॉर्म या खतांच्या दहा – पाच बाटल्या कुठूनतरी उपलब्ध करून त्या ऑनलाईन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अधिकचे डिस्काउंट देऊन विक्रीस ठेवतात. अशी माहिती समोर आल्यानंतर खत्रङ्मऊज ने संबंधितांना नोटिसा सुद्धा दिलेल्या आहेत. अंजली दमानिया यांनी आज सांगितलेल्या ऍग्री बीग्री या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मला खत्रङ्मऊज ची उत्पादने विकण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे वादात येण्यापेक्षा संबंधित कंपनीने सदर उत्पादनांची ऑनलाईन विक्री बंद केली असावी. कुठल्या एखाद्या व्यक्तीच्या सांगण्यावरून अशी विक्री बंद होत नसते, ही साधी गोष्ट अंजली दमानिया यांना समजायला हवी. मात्र त्या जाणीवपूर्वक या ऑनलाईन खरेदीच्या नावाने आवई उठवून धनंजय मुंडे यांना टार्गेट करत आहेत. मुळात ऍग्री बिग्री या प्लॅटफॉर्म वरून दमानिया यांनी ऑनलाईन ऑर्डर केल्याच्या कितीतरी आधी खत्रङ्मऊज ने सदरील बंदी घातलेली आहे. त्यामुळे दमानिया यांनी वस्तुस्थितीची संपूर्ण व योग्य माहिती पडताळून व्यक्त व्हायला हवे. मात्र बीड घटनेमध्ये एन्ट्री केल्यापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या वर सातत्याने ऐकीव व अर्धवट माहितीच्या आधारे खोटेनाटे आरोप करून सनसनी निर्माण करण्याचा सपाटा लावलेला आहे. राख वाहतूक व ऑफिस ऑफ प्रॉफिट, कृषी खात्यातील खरेदी प्रक्रिया ते अगदी अटक असलेल्या तीन आरोपींचे मृतदेह आढळले, असे अनेक धादांत खोटे आरोप याआधीही अंजली दमानिया यांनी केले असून, या संदर्भात आढळलेली, विषयांना संबंधित असलेली व नसलेली अर्धवट कागदपत्रं त्या ' पुरावे ' म्हणून पुढे करत जनतेची आणि माध्यमांची दिशाभूल करत आल्या आहेत.

## उपळी हायस्कुलमध्ये संत सेवालाल जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्यातील उपळी हायस्कूल उपळी येथे १५ फेब्रुवारी २०२५ रोजी बंजारा समाजाचे आराध्य दैवत, सदगुरु संत सेवालाल महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक भागवतराव बडे सर तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष शेख मयूर सर उपस्थित होते. श्रीमती प्रज्ञा सौंदरमल मॅडम यांनी विद्यार्थ्यांस सद्गुरु संत सेवालाल महाराज यांच्या जीवनाविषयी माहिती देऊन संत सेवालाल महाराजांनी अत्यंत प्रभावी व संवेदनशील अशी सत्यवचने, दोहे सांगून सन्मार्गाची जाणीव करून दिली. त्यांचे विचार आणि चरित्र प्रेरणादायी आहे. याची जाणीव करून दिली. यावेळी कालिदास वाघ, रमेश शेप,बालासाहेब सपकाळ,भागवत सावंत, हनुमान बडे,महादेव गोरे, अशोक जाधव, वैभव जाधव, पंकजकुमार दुबे, मोहसीन शेख, रामप्रसाद इचके यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ अंतर्गत शुभेच्छा आणि गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण कार्यक्रम आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या अध्यक्षतेखाली सचिव ॲड. व्ही.बी. मगर सर्व संचालक माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, लक्ष्मणराव शिंदे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या विद्यालयाचे विद्यार्थी आरती नाखाते, तृप्ती खंडाळे, कुंदन झीने, रितेश जाधव, आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख यांनी मनोगत प्रगट केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.एस धुतालमल, मुख्य अतिथी ॲड.व्ही.बी. मगर, माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी रेखाकला परीक्षा स्पर्धेतील आणि सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात येऊन शुभेच्छा दिल्या.

## वृक्षारोपण व विविध स्पर्धेच्या माध्यमातून खांडे पारगाव हायस्कूल मध्ये डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा वाढदिवस साजरा

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता. जि. बीड संचलित खांडे पारगाव हायस्कूल खांडे पारगाव विद्यालयात डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा वाढदिवस शाळेमध्ये वृक्षारोपण तसेच विविध स्पर्धा ज्यामध्ये हस्ताक्षर, निबंध व प्रश्नमंजुषा इत्यादींच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.ङ्गविजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच सर्वांनी संस्थेचे अध्यक्ष यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## आष्टीत संत सेवालाल महाराज यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी , पारंपारिक पोशाख, भव्य रॅली

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील १३ तांडा येथील बंजारा समाज बांधवांनी एकत्रित येऊन संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे मोठ्या उत्साहात जल्लोषात विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली धानोरा येथून पारंपरिक पोशाखात बंजारा समाजाच्या भव्य रॅलीचे आयोजन वाघळूज पर्यंत करण्यात आले होते.यामध्ये आष्टी तालुक्यातील १३ तांड्यातील ग्रामस्थ पुरुष,महिला, लहान मुले हजारोच्या संख्येने बंजारा बांधवासह सर्व जाती धर्माचे नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगद्गुरू संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती व सकल १३ यांच्यावरील येथील बंजारा समाजाच्या वतीने सकाळी १० वाजता धानोरा ते वाघळूज बंजारा पेहरावात भव्य रॅली काढण्यात आली मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले आणि संत सेवालाल महाराज की जय, असा जयघोष करत रॅलीला प्रारंभ झाला वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे रॅलीची सांगता झाली यावेळी आ.सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अंथरवण पिंपरी आश्रम शाळेत राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**



बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा तथा दीनानाथ बालक आश्रमाच्या प्रांगणात राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांची जयंती विविध कार्यक्रमासह साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशीलभाऊ पवार हे होते. यावेळी मुख्याध्यापक शिंदे सर, भूषण पवार, परमेश्वर जाधव, सचिन पवार, सुशांत पवार, पर्यवेक्षक जवरे सर, ज्येष्ठ शिक्षक पैठणे सर, तांड्यातील पांडुरंग पवार, बळीराम पवार, पोमा महाराज उपस्थित होते.याप्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. अनेक विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. व्यासपीठावरील मान्यवरांनी सेवालाल महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन निर्व्यसनी राहून आई-वडिलांचे व स्वतःचे स्वप्न साकार करून देश सेवा करावी. याप्रसंगी सुशील भाऊ पवार म्हणाले की, संत सेवालाल महाराजांनी दाखविलेल्या मार्गावर जर विद्यार्थ्यांनी वाटचाल केली तर जीवन यशस्वी होईल.

# मराठीला आकार देणारे महानुभाव साहित्य

आज आपण बोलत असलेली मराठी ही अनेक स्थित्यांतरे आणि उत्क्रांतीनंतर तयार झालेली समृद्ध भाषा आहे. अशा या समृद्ध साहित्य परंपरा लाभलेल्या मराठी भाषेस केंद्र शासनाने ऑगस्ट २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. आसा दर्जा प्राप्त झाल्यानंतर प्रथमच नवी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. त्यानिमित्ताने मराठी साहित्याचा पाया असणाऱ्या महानुभाव पंथाच्या साहित्याचा घेतलेला हा धांडोळा. आजच्या आपल्या मराठीच्या विकासामध्ये किंबहुना आज वापरात असलेल्या मराठीला आकार देण्याचे महत्वाचे काम केले ते महानुभाव पंथाने, या पंथाच्या साहित्यातील लीळाचरित्र हा चक्रधर स्वामींच्या लीळांवर आधारित ग्रंथ मराठीतील आद्य ग्रंथ म्हणावा लागेल. मराठीच्या विकासात महानुभव पंथाच्या योगदानावर टाकलेला हा प्रकाश.*

महाराष्ट्र आणि मराठी विषयी – मराठी भाषेची उत्पत्ती प्राकृतात असल्याचे सर्वश्रुत आहे. प्राकृत भाषेत लिहला गेलेला 'गाथा सप्तशती' हा आद्य: ग्रंथ आणि यातील भाषा ही अस्सल महाराष्ट्राची, गोदावरी खोऱ्यातील आहे. महाराष्ट्र प्रदेशावर साडेचारशे वर्ष राज्य करणाऱ्या सातवाहन कुलातील राजा हाल यांने हा ग्रंथ लिहला. मराठीतील पहिला शिलालेख हा कर्नाटकातील श्रवणबेळगोळा येथील श्री चावुण्ड राये करवियले श्री गंगराये सुत्ताले करवियले हा आहे. तर रायगड जिल्ह्यातील अलिबाग जवळील आक्षी येथे सापडलेला शिलालेख मराठीतील पहिला शिलालेख असल्याचे डॉ शं.गो. तुळपुळे म्हणतात. त्याही आधी 'धर्मोपदेशमाला' (इ.स. ८५९) या ग्रंथात मराठी भाषेचा उल्लेख आहे. सललयि-पय-संचारा पयडियमाणा सुवण्णरयणेल्ला ! मरहठ्ठ भासा कामिणी य अडवीय रेहंती !! असे मराठीचे वर्णन येते. सहाव्या शतकातील वराह मिहीरच्या बृहत्दसंहितेत महाराष्ट्र देशाचा उल्लेख पहावयास मिळतो. तर महाराष्ट्राचा स्पष्ट उल्लेख महानुभव लेखक डिंबकृष्णमुनी यांनी केल आहे. 'विंध्याद्रीपासौनि दक्षिणदिशेसी।कृष्णनदीपासौनि उत्तरेसी।। झाडीमंडळापासौनि पश्चिमेसि । महाराष्ट्र बोलिजे ।।' असा महाराष्ट्र प्रदेश असल्याचे ते सांगतात. याशिवाय मराठीच्या वापराची उदाहरणे आपल्याला दिवे आगर, पंढरपूर येथील ताम्रपटातून पहावयास मिळतात.

यादव काळात मराठीला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला. या राजभाषेचा विकास करण्याचे कार्य महानुभाव पंथातील अनेकांनी केले. श्री गोविंदप्रभू, भटोबास, केसोबा, डिंबकुष्णमुनी यांनी मराठीला आकार दिला. पंथियांच्या अनेक साहित्यातून मराठी समृद्ध होत गेली. त्यामध्ये म्हाईंभटांचे लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र किंवा ऋद्धिपूरचरित्र, केशिराजबास यांचे दृष्टांतपाठ, सिद्धांतसूत्रपाठ, बाईदेवबास यांचे पूजावासर, नरेंद्रस्वामी यांचे रुक्मिणीस्वयंवर, भास्करभट्ट यांचे शिशुपाळवध, उद्धवगीता, दामोरदपंडित यांचे वच्छाहरण, रवळोबास यांचे सह्याद्री महात्म्य, नारो बहाळिये यांचे ऋद्धिपूरवर्णन, विश्वनाथ पंडित यांचे ज्ञानप्रबोध, यासह स्थानपोथी, वृद्धाचार, मार्गरुढी, चरित्र अबाब, महदबेचे धवळे अशा ग्रंथांचा समावेश आहे.

सांकेतीक लिपीचा वापर – महानुभाव साहित्याचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सांकेतीक लिपीचा वापर. या वापरामुळेच अनेक वर्ष हे साहित्य सामान्यांपासून लांब राहिले. पण, याचमुळे हे सर्व साहित्य आहे त्या स्थितीत आज आपल्याला उपलब्ध झाले. यादव काळात १२ व्या शतकात महानुभाव पंथ उदयास आला. पंथियांना मार्गदर्शन करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली. या साहित्यातूनच अधुनिक मराठीला आकार मिळत गेला. यानंतरच्या काळात वारकरी सांप्रदायांने मराठी अधिक समृद्ध केली.

महानुभाव सांप्रदायाने महाराष्ट्राला दिलेल्या अनेक देणग्यांपैकी एक म्हणजे समृद्ध साहित्य. पंथियांच्या या साहित्यामध्ये सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल असा ग्रंथ म्हणले स्थानपोथी. चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात ज्या ठिकाणी भ्रमण केले त्याची भौगोलिक माहिती देणारा ग्रंथ म्हणजे स्थानपोथी. चक्रधरस्वामींनी भेटी दिलेल्या ठिकाणी पंथियांनी ओटे बांधले आहेत. त्यामुळे आजही आपणास स्थानपोथीतील गावांची, नगरांची माहिती मिळते. यातील अनेक गावे, नगरे आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे यादवकालीन महाराष्ट्र समजून घेताना स्थानपोथीचे महत्व अनन्यसाधारण आहे. एकूणच या ग्रंथाच्या माध्यमातून आपणास यादवकाळातील महाराष्ट्राचा भूगोल, संस्कृती, जीवनपद्धती, ग्रामरचना, खाद्य संस्कृती, व्यवहार, प्रशासन, घर बांधणी, व्यापार व व्यवसाय याविषयी सविस्तर माहिती मिळते. त्याकाळच्या महाराष्ट्राचे समग्र दर्शन घडवणारा उत्कृष्ट असा दुसरा ग्रंथ नाही.

लीळाचरित्र मराठीतील पहिला गद्य चरित्रग्रंथ – महानुभाव पंथांचे संस्थापक चक्रधरस्वामी त्यांच्याविषयीच्या आख्यायिकांच्या संग्रहाला लीळाचरित्र असे नाव आहे. महींद्रबास ऊर्फ म्हाईंभट यांनी नागदेवाचार्यांच्या मदतीने चक्रधरांच्या लीळा संकलित केल्या. याचा रचनाकाल सन ११७८ च्या आसपासचा आहे. तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनाचे मार्मिक चित्रण लीळाचरित्रातून आले आहे. लीळाचरित्राची भाषा म्हणजे यादवकालीन मराठी गद्याच्या समृद्धतेचा उत्तम नमुनाच होय. छोटी छोटी अर्थपूर्ण वाक्ये, अलंकृत साधेपणा हे तिचे विशेष होत. त्यावेळचे खाद्यपदार्थ, वस्त्र, चालीरिती, करमणुकीचे प्रकार, कायदे, सामाजिक सुरक्षा, सण, उत्सव इत्यादी सामाजिक जीवनाच्या दृष्टीने उपयुक्त असे अनेक उल्लेख या चरित्रग्रंथातून आले असल्यामुळे तत्कालीन समाजजीवनाच्या व धार्मिक जीवनाच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. चक्रधरांच्या काळातील वाक्प्रचार, म्हणी यांचा उपयोग करून भाषेला सजविण्याचा प्रयत्न म्हाईंभटांनी केला आहे. साधी, सरळ, सोपी पण आलंकारिक भाषा हे या चरित्रग्रंथाचे वैशिष्ट्य.

द्धिपूरलीळा उर्फ गोविंदप्रभूचरित्र – ऋद्धिपूरचे चक्रधरांचे गुरू गोविंदप्रभू उर्फ गुंडमराउळ यांनी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या आठवणी म्हाइंभटाने गोळा केल्या व त्यातून ऋद्धिपूरलीळा उर्फ गोविंदप्रभूचरित्र हा ग्रंथ सिद्ध केला. याचा रचना काळ इ.स. १२८८ आहे. प्राचीन वऱ्हाडी भाषेच्या अभ्यासासाठी हा एक उपयुक्त साधन ग्रंथ आहे. गडू = तांब्या, हारा = टोपली, हेल = पाणी भरण्याचे मडके, पोपट / पावटे = उकडलेल्या तुरीच्या शेंगा, गीदरी, उकड = नीट न बसलेला, कोनटा = कोपरा असे शब्द या ग्रंथात भेटतात.

मराठीतील पहिला कथासंग्रह दृष्टांतपाठ – दृष्टांत म्हणजे छोटीशी बोधकथा होय. प्रत्येक दृष्टांत स्वतंत्र, रोचक आहे. विचारप्रतिपादन, तत्त्वज्ञान, मांडणी, भाषाशैली आणि समाजजीवनाचे निरीक्षण या सर्वच गोष्टींनी हा ग्रंथ अपूर्व आहे. चक्रधरांचे तत्त्वज्ञान विद्वानांना रुचेल अशा मराठीतून मांडणे व अध्यात्मासारखे शास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्दसंपत्ती मराठीत रूढ करणे हे केशिराजाचे मोठे कार्य. दृष्टांतपाठ हा फक्त तत्त्वज्ञानाचा ग्रंथ नाही तर मराठीतील लोककथांचे पहिले संकलन आहे. खरे तर 'म्हातारिया'ना तो सोप्या भाषेतील अज्ञानमुंचन करणारा ज्ञानग्रंथ आहे.

रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्रस्वामींनी लिहलेला हा ग्रंथ म्हणजे मराठीतील पहिले शृंगारिक आख्यानकाव्य. काव्यदृष्ट्या व कालदृष्ट्या साती ग्रंथांमधील पहिल्या क्रमांकाचा ग्रंथ. हे भक्तीतून उमललेले विदग्ध काव्य आहे. ज्या यादवकाळात रुक्मिणीस्वयंवर लिहिले गेले त्या काळात मराठी वाययाच्या भावसृष्टीवर श्रीकृष्णाच्या भक्तीचे अधिराज्य होते. या काव्याची रचना संस्कृतमधील महाकाव्यांच्या धर्तीवर आहे. वर्णनाची विपुलता व कथानकाची मंदगती यांचा प्रत्यय येतो. रुक्मिणीस्वयंवराच्या कथेवर अनेकांनी रचना केली पण नरेंद्राची सर कुणालाच आली नाही. खरीखुरी कलावंताची दृष्टी असणारा नरेंद्र हा मराठीतील पहिला कवी आहे.

शिशुपालवध – महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता भास्करभट्ट बोरीकर आहे. रुक्मिणी-श्रीकृष्ण यांच्या चित्रणासोबतच शिशुपाळवधाचे चित्रण या ग्रंथात आहे. विरक्ती व भक्तीपेक्षा शृंगाराचे चित्रण या ग्रंथात अधिक आढळते. या ग्रंथाविषयी बाईदेवबास म्हणतात भटो ग्रंथु निका जाला : परि निवृताजोगा नव्हेचि (ग्रंथ तर उत्तम झाला आहे पण निवृत्तीमार्गासाठी उपयुक्त नाही!) बाइदेवबासांचे हे उद्गार मराठी समीक्षेचे पहिले वाक्य ठरते.

उद्धवगीता – महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता भास्करभट्ट बोरीकर. भागवताच्या एकादशस्कंधावरील मराठीतील ही पहिली टीका ठरते.

वच्छाहरण – महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. कर्ता दामोदर पंडित. दामोदरपंडिताचा कवित्वाचा विलास वृंदावनवर्णन, यमुनावर्णन, श्रीकृष्णमूर्तीवर्णन यांमधून प्रकर्षाने जाणवतो. श्रीकृष्णवर्णन आणि पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार हे दुहेरी कार्य दामोदरांनी साधले आहे.

सैह्याद्री-माहात्म्य किंवा सैह्याद्रवर्णन – सैह्याद्री-माहात्म्य किंवा सैह्याद्रवर्णन हा महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता रवळोबास आहे. मूळ ग्रंथ शके १२५४ ते १२७५ यादरम्यान केव्हातरी लिहिला गेला असावा. सैह्याद्रवर्णन काव्यातील सह्याद्री म्हणजे माहूरचा डोंगर. पश्चिम घाटावरील सह्याद्री डोंगराशी या काव्यातील सह्याद्रीचा काही संबंध नाही. सैह्यादी-माहात्म्य हे काव्य, कवीचे वर्णनचातुर्य, त्याची प्रतिभासृष्टी आणि काव्यातला रसाविष्कार या दृष्टीने वाचले तर, रवळोबास हे एक एक प्रतिभावंत कवी होते असे प्रत्ययास येते.

ज्ञानप्रबोध – महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एक. याचा कर्ता विश्वनाथ. काव्य व तत्त्वज्ञान यांचा संगम; वैराग्याची व भक्तीची शिकवण या ग्रंथात आहे.

अशा वैविध्यपूर्ण ग्रंथाच्या लिखाणातून पंथियांनी मराठीचे साहित्यविश्व प्राचीनकाळी समृद्ध केले आहे. त्यांच्या या साहित्याचा वारसा पुढील काळात संत ज्ञानेश्वरांनी पुढे नेला. संत ज्ञानेश्वर माऊलींचा भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी अशा ग्रंथांनी मराठी भाषेतील साहित्याला वेगळ्या उंचीवर नेले. तर त्यानंतर संत नामदेव, संत तुकाराम महाराज यांनी केलेल्या रचनांनी भक्तीची परंपरा जनसामान्यांपर्यंत पाझरवण्याचे काम केले.

अशा या समृद्ध मराठीभाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. ही प्रत्येक मराठी माणसासाठी नक्कीच अभिमानाची बाब आहे.

**– हेमंतकुमार चव्हाण,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# साहित्य संमेलनाच्या विचार पिठाला आण्णाभाऊ साठे यांचे नाव

**बीड । प्रतिनिधी**

देशाची राजधानी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे. त्या साहित्य संमेलनाच्या महत्वाच्या स्थळाला साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात येणार आहे. तसे पत्र अखिल भारतीय साहित्य मंडळाकडून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाला देण्यात आले आहे.अशी माहिती डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बीड शहरातील हॉटेल निलकमल येथे सोमवार (दि.१७) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अजिंक्य चांदणे बोलत होते. या पत्रकार परिषदेला उत्तम पवार, बाप्पा सोनवणे, सुभाष लोणके, नवनाथ कांबळे, विजय चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की, दिल्लीत येत्या दि.२१,२२, २३ या कालावधीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असून स्वागताध्यक्ष म्हणून शरदचंद्र पवार असणार आहेत. अजिंक्य चांदणे असंही म्हणाले की,मराठी साहित्यात आण्णाभाऊ साठे यांचे नाव अग्रगण्य असेच आहे. त्यांच्या फकिरा कादंबरी जगातील २७ भाषांमध्ये भाषांतरीत झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची साहित्य संमेलनात दखल घेतली जावी, यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून राज्यातील बीड,सातारा, कोल्हापूर, सांगली, वाशीम, लातूर, जालना, छत्रपती संभाजी नगर,बुलढाणा आशा विविध जिल्ह्यात या विषयाच्या अनुषंगाने आंदोलने झाली.संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत साहित्य मंडळ पुणे यांना लेखी निवेदने देण्यात आली होती. या चळवळीला व आंदोलनांना योग्य प्रतिसाद देत साहित्य मंडळाने आमच्या आंदोलनाची व मागणीची दखल घेत, पक्षाच्या नावाने पत्र जाहीर करून अण्णाभाऊंचा यथोचित सन्मान केला जाईल असे कळवले आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद घेऊन आम्ही साहित्य मंडळ पुणे व संमेलनाचे स्वागत अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे आभार व्यक्त करत आहोत. तसेच हा लढा यशस्वी करणाऱ्या सर्व अण्णाभाऊ साठे अनुयायांचे, पक्ष पदाधिकाऱ्यांचेही आम्ही आभार व्यक्त करत आहोत.असे अजिंक्य चांदणे म्हणाले.

### वाटेगावाला साहित्य संमेलन व्हावे

**साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्यात अतिशय मोठे स्थान आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वाटेगाव या जन्मगावी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविले जावे. या मागणीसाठी आपण साहित्य मंडळाकडे मागणी करणार आहोत. असे स्पष्टीकरण डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिले.**

### आण्णा साहित्याची खान

**साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य, १३ कथा संग्रह, १० पोवाडे, ७ चित्रपट कथा, १ प्रवास वर्णन असा मराठीचा खजिना तयार केला. आण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी जगातल्या २७ भाषांमध्ये भाषांतरीत आहे.**

## धारूर शहरात विजेचा लपंडाव नागरीक त्रस्त दिड वर्षा पासुन धारूरला कनिष्ठ अभियंता मिळेना

**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

शहरात सध्या विजेची समस्या निर्माण झाली आहे. दिवस व रात्र केव्हाही विजेचा लपंडाव दररोजचा झाला आहे. शहरातील वीज पुरवठा खंडीत होत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून अनेकांची रात्रीची झोप उडाली आहे. सध्या उन्हाळ्याची दाहकता वाढत असून नागरिक उकाड्याने हैराण झाले आहे.उकाड्याने हैराण झालेल्य नागरिक विद्युत पुरवठा वारंवार खंडीत झाल्याने त्रासाचा सामना करावा लागत आहे. वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने शहरातील नागरिकांना रात्र अंधारात काढावी लागत आहे. शहरात विजेचा नेहमीचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे येथील नागरिक त्रस्त झाले आहेत.काही दिवसपासुन उष्णतेत वाढ झाली आहे. या वाढत्या तापमाना मुळे उकाड्यापासून दिलासा मिळावा म्हणून विजेची आवश्यकता आहे. मात्र त्याचवेळी धारुर शहरातील वीज गायब होत आहे.वीज वारंवार ये-जा करीत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. मात्र याकडे महावितरण चे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे दोन दिवसावर शिवजयंती असून येत्या काही दिवसात मुस्लिम बांधवांच्या रमजानच्या महिन्यात सुरुवात होत आहे यामुळे हा सतत लपंडाव थांबावा व धारूर शहराला सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावा अशी मागणी होत आहे. या ठिकाणच्या अभियंत्याचे पद दीड वर्षा पासून रिक्त असून येथील कनिष्ठ अभियत्याची बदली झाल्या मुळे चिंचवणच्या कनिष्ठ अभियंत्याकडे येथील अतिरीक्त कार्यभार आहे या निमित्ताने धारूर महावितरण कार्यालयाला अभियंता कधी मिळणार याबाबत प्रश्न विचारला जात आहे.



*आमटे व सुर्वे विवाह प्रसंगी वधू वराना शुभेच्छा देताना माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षिरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, विजय दादा पोकळे, डॉ राजेंद्र सानप, शंकर सुस्कर, हभप डाके नाना , हभप हरिदास महाराज जोगदंड आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

### १८ फेब्रुवारी रोजी जवळा फकीर येथे पहिली बौद्ध धम्म परिषद - भदंत पय्यातीस महाथेरो

**बीड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे. या धम्म परिषदेचे उद्घाटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे.

## राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ विडा शाखा क्र.नऊ आयोजित ढकली हॉलीबॉल स्पर्धेत खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

### छत्रपती शिवाजी महाराज व माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य

**केज । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज व माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज कला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ चिंचवडगाव शाखा -विडा यांच्या वतिने आयोजित करण्यात आलेल्या ढकली हॉलीबॉल स्पर्धेत विविध जिल्ह्यांतून खेळाडूंच्या तब्बल वीस टिम सहभागी झाल्या होत्या.स्पर्धेच्या सांगतेला विजयी टिमला रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन संयोजकांच्या वतिने सन्मानित करण्यात आले आहे.



केज तालुक्यातील विडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज व माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज कला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ चिंचवडगाव शाखा -विडा यांच्या वतिने दोन दिवसीय ढकली हॉलीबॉल स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.त्यानंतर विविध जिल्ह्यांतून आलेल्या क्रिडा क्षेत्रातील खेळाडूंनी ढकली हॉलीबॉल स्पर्धेत सहभाग नोंदवत स्पर्धेला प्रचंड रंगत आणली होती.स्पर्धेत धाराशिव येथिल टीमने प्रथम क्रमांक पटकावला आसून अरविंद गलांडे यांच्या वतिने २१००० हजार रूपयांचे रोख बक्षिसह पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तर यडशी येथिल टीमने दुसरा क्रमांक पटकावला आसून अनिल ढोबळे यांच्या वतिने १६७५० रूपयांचे रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.

# वारकरी संप्रदायातील मधुकर खाडे हे निष्काम कर्मयोगी होते : ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे

### होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

**केज । प्रतिनिधी**

जो कोणत्याही फळाची किंवा परिणामांची अपेक्षा न करता, निः स्वार्थ, इच्छाशून्यपणे कर्तव्य करतो, त्याला निष्काम कर्मयोगी म्हणतात. वारकरी संप्रदायातील मधुकर महाराज खाडे हे निष्काम कर्मयोगीच होते, असे प्रतिपादन होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे कोद्रीकर यांनी व्यक्त केले.



वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. गंगापुजनानिमित्त केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव असलेले ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे रविवारी (दि.१६) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. अर्जुन महाराज लटपटे यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ।।१।। धन्य आम्ही जन्मा आलो । दास विठोबाचे झालो ।।धृ. आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे ।।२।। तुका म्हणे पावठणे । करू स्वर्गाची निशाणी ।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. महाराज म्हणाले, होळ पंचक्रोशीतील दिवंगत व्यक्तींमध्ये आवर्जून नाव घ्यावे, अशा मंडळींमध्ये मधुकर महाराज खाडे यांचा नामोल्लेख होईल. त्यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारण या क्षेत्रात पूर्ण ताकदीने झोकून दिले. जन्माला आलेला देह आपल्यातून निघून जातो. चांगुलपणाचे मूर्तिमंत व्यक्तीमत्व असलेले मधुकर महाराज खाडे यांचे निधन झाले. ते निष्काम सेवा करणारे होते. भगवंताचे चिंतन करणारे मानवी शरीर स्वर्गात स्थान प्राप्त करते. त्यासाठी जात, कुळ, धर्म याची अट ईश्वराने घातलेली नाही. मधुकर महाराज खाडे हे सेवा करून मोकळे होत असायचे, त्यांनी कधीही मालक होण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या निष्काम सेवेचे स्मरण रहावे, यासाठी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत समाधी व्हावी अशी अपेक्षा अर्जुन महाराज लटपटे यांनी व्यक्त केली. अलीकडे प्रत्येकाच्या मनात मालक होण्याची भावना असते. सेवा करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे. दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे.

### डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे किर्तन होणार

**होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे मंगळवारी (दि.१८) किर्तन होणार आहे. या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.**

## श्री नारायण विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालय आहेर चिंचोली येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवरावजी काळे अण्णा होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, सौ राजश्री काळे/ पिंगळे मॅडम हे होते.



या समारंभात अनेक विद्यार्थ्यांनी भावनिक होऊन आपले मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांची कष्टाची जाणीव ठेवून आपल्याला अभ्यास करण्याची गरज आहे असे सांगितले.

### आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण पॉलीटेकनिक कॉलेज बार्शी रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार

### २०२३-२४ प्राथमिक छाननी गुणांकन प्रसिद्ध करणे आणि सूचना व हरकती मागविणे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यासाठीचे गुणांकन प्रसिद्ध करण्यात आले असून यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणार्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासनाने दि. २९ डिसेंबर, २०२३ व दि.२५ जानेवारी २०२४ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली, २०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/व्यक्ती यांच्याद्वारा दि. १४ जानेवारी ते २६ जानेवारी, २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची प्राथमिक छाननी करण्यात आलेली असून, प्राथमिक छाननीचे गुणांकन तक्ते शासन निर्णय क्र. शिछपु. २०२३/ प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२ दि. २९ डिसेंबर, २०२३ मधील नियम क्र.१.१९, नियम क्र.१.२०, नियम क्र.१.२१ अन्वये https:// shivchhtrapatiawards.com या लिंकवर एकूण गुणांकनासह दि.१५ ते १८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीसाठी सूचना व हरकतींसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

प्राथमिक छाननी अहवाल हे अंतिम नसून, त्यामध्ये आपल्या सूचना व हरकतींनुसार बदल होऊ शकतो, तसेच सूचना/हरकतीनंतर सदरचा अहवाल पुनश्च प्रसिद्ध करण्यात येणार नाही.

प्राथमिक छाननी अहवालात केलेल्या पुरस्कार गुणांकनाबाबत कांही आक्षेप किंवा सूचना असतील तर त्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात वशीज्ञ१४.वीॢी-ह्नर्सी.ळप या ई-मेल आय.डी.वर सादर कराव्यात. विहीत नमूना या टिप्पणीच्या पृष्ठ क्र. २ वर दिलेला आहे.




